# पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित

शॉप नं.१०१, शुभम गॅलेरिया, पिंपरी स्टेशन पुणे ४११०१८

फोन नंबर – ०२० – २७४६००४४–४५ मो. ९९२२५०१४६८

---

रजि. नं. पी.एन.ए /बी.एन.के–१९९ स्थापना – दिनांक : १३ जुलै १९७२

ऑडीट वर्ग अ

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित च्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची २०१९२०२० सालाची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दिंनाक १८.०८.२०२० रोजी सकाळी ११ वाजता ऑन लाईन (झूम अॅप व्दारे) घेणेत येणार आहे. सदर सभेत पुढील विषयपत्रिकेवरील विषयांचा विचार होवुन निर्णय घेणार आहोत. तरी सर्व सभासदांनी झूम अॅप डाऊन लोड करुन घ्यावा की ज्यामुळे वार्षिक सभेची माहिती मिळेल याची सर्वसभासदांनी नोंद घ्यावी व सहकार्य करावे.

### – विषयपत्रिका –

१) दिनांक ८.६.२०१९ रोजी भरलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा सभावृत्तांत वाचुन मान्यता देणे व कायम करणे .
२) सन २०१९ – २०२० या आर्थिक वर्षाच्या संचालक मंडळाच्या कामकाजाच्या अहवालास मान्यता देणे.
३) दिनांक ३१.३.२०२० रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या हिशोबी पत्रकांस (नफा तोटा पत्रक,ताळेबंद ) स्विकृती देणे .
४) दिनांक ३१.३.२०२० अखेर संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार नफा विभागणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.
५) सन २०१९ – २०२० सालात संचालक मंडळाने घेतलल्या कर्जाची माहिती घेवुन मान्यता देणे .
६) सन २०१९ – २०२० चे अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे .
७) सन २०२० – २०२१ या आर्थिक वर्षाकरिता मा. संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजप्रत्रकास मान्यता देणे .
८) सन २०२० – २०२१ या साला करिता वैधानिक लेखापरिक्षकाची व अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणुक करून त्यांचे मानधन ठरविणे .
९) सन २०१९ – २०२० चे वार्षिक लेखापरिक्षण अहवालाचे वाचन करून अहवाल दप्तरी दाखल करणे .
१०) उपविधी दुरुस्ती बाबत (सोबत जोडले प्रमाणे)
११) संस्थेच्या सेवकांना सातवा वेतन आयोग लागू करणे बाबत विचार करणे.
१२) मा. अध्यक्षसाहेब यांचे परवानगीने येण्याऱ्या ऐनवेळच्या विषयांवर विचार विनिमय करून निर्णय घेणे .

दिनांक : / /२०२०

(श्री. मुकुंद विश्वनाथ वाखारे )
सचिव
संचालक मंडळाचे आदेशावरून

---

**टिप** १) गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी वर नमुद केलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाने भरेल व त्या सभेत वरील विषय पत्रिकेप्रमाणे कामकाज पुर्ण करणेत येईल .
२) हिशोबासंबधी अगर आर्थिक काही माहिती हवी असल्यास सभादांनी संस्थेच्या कार्यालयात समक्ष येवुन माहिती घ्यावी त्यासंबधी सभेत स्वतंत्र खुलासा केला जाणार नाही .
३) कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासठी सभेस प्रत्येक्ष हजर न राहता आपली उपस्थिती ऑनलाईन नोंदवावी व आपल्या काही सुचना असल्यास सभेपुर्वी २ दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात कळवावी.
४) संस्थेचा सन २०१९–२०२० ची हिशोबी पत्रकेव वार्षिककामाचा अहवाल www.pcmc.org या वेबसाईट वर प्रसिध्द केली आहे.